पेट्रोलियम पदार्थांच्या खरेदी विक्रीवर मर्यादा घालण्याकरीता निर्देश देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन आदेश क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क.८१/नापु-२७**

मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १२ जून, २०२६

**संदर्भ-:**

१. पेट्रोलियम अधिनियम, १९३४
२. अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ पेट्रोलियम उत्पादने (उत्पादन, साठवणूक आणि पुरवठा यांचे नियमन) आदेश, १९९९
३. पेट्रालियम नियम, २००२
४. मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन अॅन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५
५. मोटर स्पिरीट व हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रिब्युशन अॅन्ड प्रिव्हेशन ऑफ मालप्रॅक्टिसेस) आदेश, २००५ च्या अनुषंगाने शासनाचे दिनांक १९ जून, २००६ रोजीचे आदेश.
६. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक २६/०५/२०२६ रोजीचे पत्र
७. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क.८१/नापु-२७, दिनांक ०५/०६/२०२६
८. पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार यांची क्र. सी.जी.डी.एल.अ-११०६२०२६-२७३३७२, दिनांक ११/०६/२०२६ रोजीची अधिसूचना.

**शासन आदेश**

सद्यस्थितीमध्ये सुरु असलेल्या जागतिक भू-राजकीय घडामोडींमुळे वैश्विक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे, देशातील पेट्रोलियम उत्पादनांच्या पुरवठयावर परिणाम झाला आहे.

सद्यस्थितीत राज्यामध्ये पेट्रोल/डिझेलचा साठा उपलब्ध आहे. तथापि, काही जिल्हयांमध्ये घाऊक औद्योगिक ग्राहकांकडून किरकोळ पेट्रोल/डिझेल विक्री केंद्रावरून मोठ्या प्रमाणात डिझेल खरेदी केल्याच्या घटना निदर्शनास आल्याने शासनाने दिनांक ०५ जून, २०२६ रोजी परिपत्रक प्रकाशित केले होते. सदर परिपत्रकान्वये पेट्रोलियम उत्पादनांची साठेबाजी आणि काळाबाजार, किरकोळ दुकानांमधून पेट्रोलियम पदार्थाची अनधिकृत विक्री, किरकोळ विक्री केंद्रांमधून टँकरमध्ये/ बाउजरमध्ये अनधिकृतपणे इंधन भरणे, पेट्रोलियम पदार्थामध्ये भेसळ करणे, गळती करणे, अनधिकृत हस्तांतरण, नियमापेक्षा जास्त किंमत आकारणे, विहित

केलेल्या मानकांपेक्षा कमी दर्जाचे पेट्रोलियम पदार्थ पुरवणे इ. गैरप्रकार करण्याऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत राज्य शासनाच्या दिनांक १९ जून २००६ च्या आदेशान्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. तसेच, व्यावसायिक/औद्योगिक संस्थांना किरकोळ विक्री केंद्रावरुन पेट्रोलियम पदार्थांचा पुरवठा करण्यात येत नसल्याचे सुनिश्चित करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

सद्यस्थितीमध्ये, केंद्र शासनाने दिनांक ११ जून, २०२६ रोजी "मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (किरकोळ विक्री केंद्रांमार्फत पुरवठ्याचे अस्थायी विनियमन) आदेश, २०२६" निर्गमित केला आहे. त्यानुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्याची बाब शासन विचाराधीन होती.

उपरोक्त बाबींचा विचार करुन पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत:-

१) संस्थात्मक, औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांनी किरकोळ विक्री केंद्रांमधून पेट्रोल, डिझेल खरेदी करू नये तसेच, सदर ग्राहकांनी पेट्रोल, डिझेल घाऊक ग्राहकांसाठी असलेल्या पंपावरुनच खरेदी करण्याबाबत संबंधित ग्राहकांना सूचना देण्यात याव्यात.

२) किरकोळ विक्री केंद्रांवरुन विक्री करण्यात येणारे डिझेल, पेट्रोल केवळ वाहनांच्या टाकीत किंवा पेसो (PESO) प्रमाणित कंटेनरमध्येच करण्याबाबत किरकोळ विक्री केंद्रांना सूचना देण्यात याव्यात.

३) प्रतिदिन, प्रतिग्राहक, प्रतिवाहन २०० लिटरपेक्षा जास्त डिझेलची विक्री करण्यात येऊ नये. तसेच, सदर डिझेलची पुनर्विक्री करण्यास मनाई आहे.

४) तेल विपणन कंपन्या व किरकोळ विक्री केंद्र डीलर्स यांनी वरील निर्बंधांचे काटेकोर पालन सुनिश्चित करावे.

५) तसेच, संबंधित तेल विपणन कंपन्यांच्या क्षेत्रीय/विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व किरकोळ विक्री केंद्रे (पेट्रोल पंप) डीलर्सना सदर आदेशाची माहिती तातडीने कळवावी आणि वरील तरतुदींचे पालन होत असल्याची खातरजमा करावी.

६) सदर आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधितांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ व मोटर स्पिरिट आणि उच्च गती डिझेल (पुरवठा आणि वितरणाचे विनियमन आणि अनाचार प्रतिबंध) आदेश, २००५ अंतर्गत कारवाई करण्यात यावी आणि याबाबतचा अहवाल या विभागास सादर करावा.

७) उपरोक्त सूचना केंद्र शासनाचे दिनांक ११ जून, २०२६ रोजीच्या अधिसूचनेन्वये देण्यात आलेले आदेश लागू असेपर्यंत अंमलात राहतील.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२६०६१२१७५०२६३७०६ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ASHOK MAROTI ATRAM
Date: 2026.06.12 17:51:44 +05'30'

**(अशोक आत्राम)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति-**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
६. मा.राज्यमंत्री (अनापुवग्रासं) यांचे खाजगी सचिव.
७. सचिव (अनापुवग्रासं), मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव/महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१०.सर्व विभागीय आयुक्त
११.सर्व पोलीस आयुक्त
१२.सर्व जिल्हाधिकारी
१३.सर्व पोलीस अधिक्षक
१४.नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
१५.सर्व विभागीय आयुक्त
१६.सर्व उपायुक्त पुरवठा
१७.सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
१८.सर्व उप विभागीय अधिकारी
१९.सर्व तहसिलदार
२०.सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
२१. सर्व अन्नधान्य सहायक वितरण अधिकारी
२२.सर्व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी
२३.सर्व उपनियंत्रक शिधावाटप
२४.सर्व सहायक नियंत्रक शिधावाटप
२५.पोलीस उप अधीक्षकापेक्षा कमी दर्जाचे नसलेले सर्व पोलीस अधिकारी
२६.राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, मुंबई.
२७.निवडनस्ती (नापु-२७)